# पुण्यात डेंग्यूचा वाढता विळखा

## चार महिन्यांत २२ रुग्ण, नगर रोड-वडगाव शेरी सर्वाधिक हॉटस्पॉट; मान्सूननंतर डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला

**महाईन्यूज । पुणे**

**मान्सूनचे आगमन होताच शहरात किटकजन्य आजारांनी डोके वर काढले असून, एप्रिल ते जुलै या चार महिन्यांच्या कालावधीत शहरात डेंग्यूचे तब्बल २२ बाधित रुग्ण आढळले आहेत. विशेष म्हणजे, जून आणि जुलै या अवघ्या दीड महिन्यात १८ रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयानुसार नगर रोड-वडगाव शेरी, कोथरूड आणि औंध-बाणेर या भागांत डेंग्यूचा प्रादुर्भाव सर्वाधिक पाहायला मिळत आहे.**




पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत शहरात डेंग्यूचा एकही रुग्ण आढळला नव्हता. मात्र, एप्रिलमध्ये कसबा-विश्रामबागवाडा आणि भवानी पेठ येथे प्रत्येकी एक रुग्ण आढळला.

मे महिन्यात रुग्णसंख्या शून्य होती. परंतु, पावसाला सुरुवात होताच जून महिन्यात अचानक १२ नवे रुग्ण आढळून आले आहेत, तर जुलैच्या पहिल्या १५ दिवसांतच आठ रुग्णांचे निदान झाले आहे. एकूण २२ रुग्णांपैकी ७२ टक्क्यांपेक्षा जास्त रुग्ण केवळ तीन क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत नोंदवले गेले आहेत.

पुणे महापालिकेच्या नगर रोड-वडगाव शेरी या भागात सर्वाधिक सात रुग्ण डेंग्यूचे आढळून आले आहेत, तर येरवडा-कळस धानोरी, धनकवडी-सहकारनगर, सिंहगड रोड, वारजे-कर्वेनगर, हडपसर-मुंढवा, केशवनगर, वानवडी-रामटेकडी आणि बिबवेवाडी या उर्वरित भागांत सध्या एकही रुग्ण आढळलेला नाही.

पावसाळ्यात विविध ठिकाणी तुंबणारे पाणी, गृहनिर्माण संस्थांच्या आवारात साचलेली पाण्याची डबकी आणि बांधकाम क्षेत्रांवरील अस्वच्छता डासांच्या पैदाशीसाठी पोषक ठरत आहे. रुग्णसंख्या अचानक वाढल्यामुळे महापालिकेने किटकप्रतिबंधक धूर फवारणी व तपासणी मोहीम तीव्र करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. डेंग्यूचा रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्याला मच्छरदाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. रुग्णाला चावलेल्या डासांमार्फत संसर्गाचा प्रसार होऊ नये, यासाठी ही खबरदारी महत्त्वाची आहे. तसेच रुग्णालय परिसरात आणि घराच्या आसपास पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. डेंग्यू किंवा चिकुनगुनियाचा रुग्ण आढळल्यास कुटुंबातील सदस्यांनी पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करणे, डासांपासून संरक्षण करणारी साधने वापरणे आणि दिवसा चावणाऱ्या डासांपासूनही स्वतःचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

### क्षेत्रीय कार्यालयांप्रमाणे रुग्ण

- नगर रोड - वडगाव शेरी : ७ रुग्ण
- कोथरूड : ५ रुग्ण
- औंध-बाणेर : ४ रुग्ण
- कोंढवा-येवलेवाडी : २ रुग्ण
- ढोले पाटील रोड, घोले रोड-शिवाजीनगर, कसबा-विश्रामबागवाडा आणि भवानी पेठ प्रत्येकी एक रुग्ण

**१ जुलैपासून २१ जुलैपर्यंत डेंग्यूचे १९२ संशयित रुग्ण आढळल्याची नोंद आरोग्य विभागाकडे झाली आहे.**

# पुणे विमानतळावरच होणार इमिग्रेशन-कस्टम्स प्रक्रिया; प्रवाशांचा वेळ वाचणार

**महाईन्यूज । पुणे**

**केंद्र सरकारच्या हब अँड स्पोक मॉडेलअंतर्गत पुणे विमानतळ आता परदेशी प्रवाशांसाठी फीडर म्हणून कार्य करणार आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवाशांची इमिग्रेशन आणि कस्टम्सची प्रक्रिया थेट पुणे विमानतळावरच पूर्ण होणार असून, दिल्लीतील विमानतळावर (हब) प्रवाशांना फक्त सिक्युरिटी चेकिंग करून परदेशात प्रवास करता येणार आहे.**



नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या वरिष्ठ पथकाने यासंदर्भात नुकतीच पुणे विमानतळावर प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केली. या प्रस्तावित व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावर नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक आणि पाहणी दौरा पार पडला.

यामध्ये नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, इमिग्रेशन विभाग, कस्टम्स विभाग आणि विविध विमान कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या बैठकीत हब अँड स्पोक मॉडेलची कार्यपद्धती, सुरक्षितता, प्रवासी सुविधा आणि आवश्यक तांत्रिक बदलांवर चर्चा झाली. त्यानंतर पथकाने विमानतळ परिसरातील प्रवासी प्रक्रिया क्षेत्र, टर्मिनल सुविधा आणि सुरक्षेची पाहणी केली. या महत्त्वपूर्ण पाहणीमुळे पुणे विमानतळावर 'हब अँड स्पोक' मॉडेलच्या अंमलबजावणीच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले आहे.

> पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातून परदेशात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. हब अँड स्पोक मॉडेलमुळे पुणे विमानतळावरील सुविधा अधिक सक्षम होणार आहेत. परदेशात उड्डाण करणाऱ्या प्रवाशांची इमिग्रेशन आणि कस्टम तपासणी पुणे विमानतळावरच पूर्ण होणार असल्याने मुख्य आंतरराष्ट्रीय विमानतळांवर (हब) त्यांचा वेळ वाचेल आणि प्रवाशांना विनाअडथळा परदेशात प्रवास करता येईल. यासंदर्भात मंत्रालय आणि संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला असून, पायाभूत सुविधांची पुणे विमानतळावर पाहणी केली आहे. लवकरच याची अंमलबजावणी केली जाईल.
>
> **- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ.**

### प्रवाशांना होणारे प्रमुख फायदे

- मुंबई किंवा दिल्लीसारख्या मुख्य हब विमानतळावर पोहचल्यानंतर तेथील इमिग्रेशन आणि कस्टम्सच्या लांब रांगांत उभे राहावे लागणार नाही.
- पुण्याहून तपासणी पूर्ण झाली असल्यामुळे मुख्य विमानतळावरून पुढील कनेक्टिंग फ्लाइट पकडणे अधिक सोपे आणि जलद होईल.
- या मॉडेलमुळे पुणे विमानतळाची क्षमता वाढणार असून, भविष्यात नवीन आंतरराष्ट्रीय मार्गांना आणि उड्डाणांना प्रोत्साहन मिळेल.